पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-१
(विशेष सभा)
सभावृत्तांत

दि.- ५/४/२०१३ वेळ- दुपारी १:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची अध्यक्ष निवडीची विशेष सभा शुक्रवार दिनांक ०५/०४/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता महापालिका सभागृह, पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी १८ येथे मा. श्री.अनिल कवडे, पिठासीन अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.मोहिनीताई विलास लांडे महापौर
२) मा.आल्हाट मंदा उत्तम
३) मा.काळजे नितीन प्रताप
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.वाबळे संजय मल्हारराव
६) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
७) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
८) मा.सुपे आशा रविंद्र
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.गव्हाणे सुरेखा शंकर
११) मा.महेशदादा किसन लांडगे
१२) मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१३) मा.लोंढे शुभांगी संतोष
१४) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१५) मा.गायकवाड संध्या सुरदास
१६) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१७) मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- प्रभाग अधिकारी, श्री. रविंद्र जाधव-प्रशासन अधिकारी क प्रभाग इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

प्रथम प्रभाग अधिकारी श्री. डी.एम.फुंदे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ०४/०४/२०१३ रोजी विहीत मुदतीत प्राप्त झालेले एक नामनिर्देशन पत्र वाचून दाखविले व पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करणेबाबत विनंती केली. सदर एक नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सुचक व अनुमोदक खालील प्रमाणे होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | गव्हाणे सुरेखा शंकर | लोंढे शुभांगी संतोष | †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे |

वरीलप्रमाणे क प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली व ते वैध ठरवण्यात आले. त्यामध्ये मा. क प्रभाग समिती अध्यक्ष पदाची निवडणूक लढविणारे मा.गव्हाणे सुरेखा शंकर या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक-१ विषय क्रमांक- १
दिनांक- ५/४/२०१३ विभाग- क प्रभाग प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समिती अध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज मुदतीत दाखल झाला तो वैध ठरवण्यात आला आहे. सदर उमेदवारी अर्ज मागे घेण्याकरिता १५ मिनीटांचा अवधी दिला असता सदर कालावधीमध्ये उमेदवारांनी अर्ज माघारी घेतला नसल्याने मा. क प्रभाग समिती अध्यक्ष पदाची निवडणूक लढविणारे मा.गव्हाणे सुरेखा शंकर या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. गव्हाणे सुरेखा शंकर यांची क प्रभाग समितीचे अध्यक्ष पदी रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहीर करणेत आले.

सही/-
( अनिल कवडे)
पिठासीन अधिकारी
तथा
मुख्यकार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे

त्यानंतर नवनिर्वाचित **अध्यक्षा मा.गव्हाणे सुरेखा शंकर** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

ठराव क्रमांक- **२** विषय क्रमांक- २
दिनांक- ५/४/२०१३ विभाग- क प्रभाग प्रशासन
सुचक- मा.आशा सुपे अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.** ( पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी असेलतर दुस-या दिवशी) क प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **अध्यक्षा मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
( गव्हाणे सुरेखा शंकर )
अध्यक्षा
क प्रभाग समिती, भोसरी

प्रति,
सर्व संबंधित

---------------------------------

क्र-कप्र/कावि/ २० /२०१३
दिनांक- ५/४/२०१३

प्रशासन अधिकारी (सभाशाखा)
क प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका